ePaper

**लाडकी बहीण योजनेचे निकष बदलले? लाभार्थ्यांच्या अर्जांची पडताळणी होणार?**

वर्ष - 8 । अंक -154 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 12 डिसेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत


- मुश्ताक अली ट्रॉफीच्या उपांत्य फेरीत!
- रोहितला कसोटी क्रमवारीत धक्का
- इंडिया आघाडीचा महाभियोग प्रस्ताव!
- करोनामुळे झाले नाहीत लोकांचे मृत्यू


### शहरातील हवा प्रदूषणाचा सामना करण्यासाठी

# ‘ग्रॅप’ ॲक्शन प्लॅन’!

**» प्रगत तंत्रज्ञानाद्वारे हवेच्या गुणवत्तेच्या अंदाजावर निरीक्षणाद्वारे होणार ठोस कृती**



**। पिंपरी-चिंचवड ।महाईन्यूज**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने शहरातील हवा प्रदूषणाचा सामना करण्यासाठी ‘ग्रेडेड रिस्पॉन्स ॲक्शन प्लॅन’ (GRAP) प्रकल्पाची सुरुवात केली आहे. या प्रकल्पामध्ये शहराची हवेची गुणवत्ता पद्धतशीरपणे सुधारली आहे याची खात्री करण्यासाठी वास्तविक वेळेमध्ये निरिक्षण प्रणाली, अत्याधुनिक अंदाज आणि तात्काळ अंमलबजावणी यांचा समावेश आहे. सदर प्रकल्पासाठी ‘सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ ॲडव्हान्स्ड कॉम्प्युटिंग’ (C-DAC) द्वारे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर ग्रॅप (GRAP) उपक्रमाची सुरुवात करण्यात आली असून महानगरपालिकेने हवेच्या गुणवत्तेच्या आव्हानांचा अंदाज, निरीक्षण आणि सक्रियपणे कृती करण्यासाठी महत्वाचे धोरण तयार केले आहे.

महानगरपालिकेने नॅशनल क्लीन एअर प्रोग्राम (NCAP) च्या अंतर्गत, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने महापालिका हद्दीमध्ये हवा शुद्धीकरण प्रणाली, धुके घालविणारी उपकरणे, रस्ता साफसफाई करणारी उपकरणे (रोड वॉशर) आणि पिचकारी आधारित पाण्याचे फवारे असणारी प्रणाली अशा विविध बाबींच्या माध्यमातून हवा प्रदुषित होण्यापासून प्रतिबंध करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

### ग्रॅप प्रणाली द्वारे हवेच्या गुणवत्तेबाबत असे केले जाणार निरिक्षण...

१. ग्रॅप प्रणालीच्या दोन, तीन व चार या टप्प्यांतर्गत सुधारित हवेच्या गुणवत्तेचा अंदाज हे सी-डॅक (C-DAC) च्या ‘निर्णय समर्थन प्रणाली’ नुसार हवेच्या गुणवत्तेच्या अंदाजांवर तीन दिवस अगोदर सुरू केले जातील. सुचविण्यात आलेले उपाय किमान १५ दिवसांसाठी किंवा हवा गुणवत्ता निर्देशांक (AQI) मध्ये लक्षणीय सुधारणा दिसून येईपर्यंत लागू करण्यात येतील. महानगरपालिका सी-डॅकच्या अंदाजानुसार, शहराच्या सर्व भागामधील पीएम २.५, पीएम १०, एनओ एक्स, एसओ एक्स सारख्या प्रदूषकांवर लक्ष केंद्रित करणार आहे.

२. वाहनांच्या प्रदूषणाची कठोर देखरेख ठेवण्यासाठी महत्वाची यंत्रणा निर्माण केली



असून यामध्ये ANPR कॅमेरे आणि प्रत्यक्षरित्या कामावर असणारे कर्मचारी हे प्रादेशिक परिवहन कार्यालय आणि आणि वाहतूक पोलिस यांच्याकडे उपलब्ध असणाऱ्या माहितीच्या आधारे एकात्मिक प्रणालीद्वारे उत्सर्जन नियंत्रण अनुपालन (ECC) ट्रॅक करतील.

### हवा गुणवत्ता निर्देशांकाच्या स्तरांवर ग्रॅपचा कृती आराखडा

**टप्पा १ – (हवा गुणवत्ता निर्देशांक १०१–३००) :**
रस्त्यावरील धूळ नियंत्रित करणे, बेकायदेशीर कचऱ्याची विल्हेवाट लावणे, वाहतूक व्यवस्थापन सुधारण्यावर लक्ष केंद्रित करण्यात येणार.

**टप्पा २ – (हवा गुणवत्ता निर्देशांक ३०१ – ४००) :**
डिझेल जनरेटरवरील निर्बंध, रस्त्यांची स्वच्छता आणि सार्वजनिक वाहतुकीचा प्रचार यांचा समावेश आहे.

**टप्पा ३ – (हवा गुणवत्ता निर्देशांक ४०१- ५००) :**
अत्यंत प्रदूषण करणारे उद्योग बंद करण्यात येणार, वाहनांच्या प्रतिबंधात्मक क्षेत्र तयार करुन उल्लंघनावर कठोर दंड आकारण्यात येणार.

**टप्पा ४ – (हवा गुणवत्ता निर्देशांक ५०० हून अधिक) :**
प्रदूषणाला आळा घालण्यासाठी वाहन बंदी, संभाव्य शाळा बंद आणि कडक दंड लागू करण्यात येणार.

### कर्मचाऱ्यांकडून रात्रं-दिवस गस्त...

महानगरपालिकेने ग्रॅप प्रणालीचा एक भाग म्हणून पर्यावरणीय प्रदूषणाचा सामना करण्यासाठी ठोस उपाययोजना सुरू केल्या आहेत. प्रदुषणाबाबत पाळत व दक्षता ठेवण्यासाठी, विविध प्रकारच्या कचरा – संबंधित व पर्यावरणीय उल्लंघनांवर नियंत्रण व गस्त घालण्यासाठी एक समर्पित एजन्सीची नेमणूक करण्यात आली आहे. यामध्ये १ प्रोजेक्ट मॅनेजर, ४ पर्यवेक्षक, २ डेटा एन्ट्री ऑपरेटर आणि ३२ जणांचा प्रत्यक्ष जागेवरील कर्मचाऱ्यांचा व ३९ कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे.

# भाजपची महापालिकेची तयारी

## महाविकास आघाडीची पराभूत मानसिकता मात्र कायम

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विधानसभा निवडणुकीत महायुतीला आणि पक्ष म्हणून भाजपला सर्वाधिक जागा मिळाल्यानंतरही या यशामध्ये फार रममाण न राहता भाजपने आता महापालिका निवडणुकीवर लक्ष केंद्रित केले आहे. शहरातील आठही विधानसभा मतदारसंघांत भाजपने सदस्य नोंदणी मोहीम राबविण्यास सुरुवात केली आहे.**



दुसरीकडे, महाविकास आघाडीची महापालिका निवडणुकीच्या दृष्टीने कुठलीही हालचाल दिसत नाही. विधानसभा निवडणुकीतील पराभव आणि मतदान यंत्रांवरील आक्षेप यांमध्येच आघाडी अडकली असल्याचे चित्र आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपला फटका बसला होता. त्यानंतर सहा महिन्यांनी झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपला घवघवीत यश मिळाले. या विजयामुळे शहर भाजपचा आत्मविश्वासही उंचावला आहे. त्यादृष्टीने येत्या काही महिन्यांत होणाऱ्या महापालिका निवडणुकीची तयारी भाजपकडून करण्यात आली असून महापालिकेवर भगवा झेंडा फडकविण्याचा निर्धार स्थानिक पदाधिकाऱ्यांनी केला आहे.महापालिका निवडणूक तयारीच्या दृष्टीने शहरातील आठही विधानसभा मतदारसंघात सदस्य नोंदणी अभियान हाती घेण्यात आले आहे. त्यादृष्टीने भाजप पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. शहर सरचिटणीस पुनीत जोशी, रवींद्र साळेगावकर, वर्षा तापकीर, सुभाष जंगले, राघवेंद्र मानकर, प्रमोद कोंढरे, राजेंद्र शिळीमकर, राहुल भंडारे, महेश पुंडे, सुशील मेंगडे यांच्यासह माजी नगरसेवक शहर पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.या बैठकीत प्रत्येक मतदारसंघात कमीत कमी ५० हजार सदस्य करण्याचा आणि प्रत्येक प्रभागात कमीत कमी १० हजार सदस्य नोंदणी करण्याचा संकल्प करण्यात आला. देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी, राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वावर जनतेने विश्वास दाखवून शाश्वत विकासाला प्राधान्य दिल्याचे निवडणूक निकालावरून दिसत आहे. भाजपकडे येणाऱ्यांसाठी राष्ट्रीय स्तरावर सदस्य नोंदणी मोहीम सुरू केली आहे. त्याचा एक भाग म्हणून शहरामध्येही सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात येणार आहे. प्रत्येक कार्यकर्ता जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करणार आहे, असे भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी सांगितले.भाजपने एकीकडे सदस्य नोंदणी मोहीम राबविण्याचे ठरविले आहे, तर दुसरीकडे आघाडीची महापालिका निवडणुकीच्या दृष्टीने कुठलीही हालचाल नसल्याचे चित्र आहे. विधानसभा निवडणूक निकालानंतर महाविकास आघाडीकडून मतदान यंत्रांवर आक्षेप नोंदविण्यात आला होता.

### मतदारसंघात सदस्य नोंदणी अभियान

न्यायालयीन प्रक्रिया सुरू करण्याचे आघाडीकडून निश्चित करण्यात आले आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपला फटका बसला होता. त्यानंतर सहा महिन्यांनी झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपला घवघवीत यश मिळाले. या विजयामुळे शहर भाजपचा आत्मविश्वासही उंचावला आहे. त्यादृष्टीने येत्या काही महिन्यांत होणाऱ्या महापालिका निवडणुकीची तयारी भाजपकडून करण्यात आली असून महापालिकेवर भगवा झेंडा फडकविण्याचा निर्धार स्थानिक पदाधिकाऱ्यांनी केला आहे. महापालिका निवडणूक तयारीच्या दृष्टीने शहरातील आठही विधानसभा मतदारसंघात सदस्य नोंदणी अभियान हाती घेण्यात आले आहे.

---

# शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त ‘महाआरोग्य अभियान’

## विधायक उपक्रम: संजीवनी आरोग्य मित्र व डॉक्टर सेलचा पुढाकार!

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा व खासदार शरदचंद्र पवार यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यभरात “शरदचंद्र महाआरोग्य अभियान” आयोजन करण्यात आले आहे. संजीवनी आरोग्य मित्र व डॉक्टर सेलच्या माध्यमातून हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.**




भारताचे माजी संरक्षणमंत्री व कृषिमंत्री तसेच महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री, पद्मविभुषण मा. शरदचंद्रजी पवार साहेब १२ डिसेंबर हा ८४ वा वाढदिवस संपन्न होऊन ८५ व्या वर्षात पदार्पण करत आहेत. शरद पवार संजीवनी आरोग्य मित्र व डॉक्टर सेल यांच्या माध्यमातून राज्यभरात ''शरदचंद्र महा आरोग्य अभियान राबविण्यात येत आहे. महाआरोग्य अभियान दि.१२ डिसेंबर २०२४ ते दि. १२ जानेवारी २०२५ पर्यंत असणार असून यामध्ये मोफत आरोग्य तपासणी व शस्त्रक्रिया तसेच ‘कृत्रिम हात व पाय वाटप अभियान’, ‘मोफत डोळ्यांचे तिरळेपणावर शस्त्रकीया’, ‘कॅन्सर आजारावरील शस्त्रक्रिया व महागडी चाचणी पेट स्कॅन फक्त रु. ७०००/-’, ‘मोफत गुडघा व खुबा सांधेरोपण शस्त्रक्रिया अभियान’, ‘मोफत प्रेग्नेंसी तसेच सिजरिंगचे शस्त्रक्रिया’, ‘मोफत दिव्यांग व्यक्तींकरिता इलेक्ट्रीकॅल बाइसिकल व कानाच्या श्रवण यंत्र वाटप’, ‘मोफत हृदयावरील शस्त्रक्रिया / अल्प दरात अँजिओग्राफी रु. १९९९/-’ या योजनांचा लाभ राज्यभरातील रुग्णांना घेता येईल. आरोग्य अभियानाच्या उद्घाटन प्रसंगी आमदार रोहित पवार, आमदार बापूसाहेब पठारे, पुण्याचे माजी महापौर अंकुश काकडे , प्रशांत जगताप , विकास पासलकर , तसेच महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष डॉक्टर सेल डॉ. सुनील जगताप, शरद पवार संजीवनी आरोग्य मित्र राज्य प्रमुख डॉ. सतीश कांबळे उपस्थित होते. तसेच मा. श्री विठ्ठल शेठ मणियार यांच्या शुभहस्ते शरदचंद्र महाआरोग्य अभियानाचे लोकअर्पण करण्यात आले.

### नोंदणी आवश्यक... !

राज्यातील आरोग्य सेवा या खूप महागड्या झाल्या आहेत ज्या सर्वसामान्य लोकांच्या आटोक्या बाहेर आहेत. राज्यातील जनतेने या आरोग्य अभियानाचा लाभ घ्यावा व जास्तीत जास्त लोकांपर्यंत आरोग्य अभियान पोहोचवावे हा आमचा एक प्रयत्न आहे. आरोग्य हीच सर्वात मोठी संपत्ती आहे हे लक्षात घेऊन राज्यातील जनतेला निरोगी आयुष्य देण्याचा हा एक संकल्प शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या माध्यमातून आम्ही करत आहोत , असे आमदार रोहित पवार यांनी सांगितले. या योजनेचा लाभ घेण्याकरिता हेल्पलाइन नंबरवर कॉल करून रुग्णांनी रजिस्ट्रेशन करणे अनिवार्य आहे. अधिक माहितीसाठी 9822059439 संपर्क करावा.

## कुदळवाडी येथील भंगार दुकाने तात्काळ हटवा!

# सोसायटीधारकांचा संताप!

### सोसायटी फेडरेशनची मागणी : महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन

| पिंपरी-चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**कुदळवाडी परिसरातील सर्व बेकायदेशीर स्क्रॅपची दुकाने, कारखाने, शॉप , गोडाऊन यांच्यावर कारवाई करून ही सर्व या भागातील अनधिकृत गोदामे हटवण्यात यावीत, अशी मागणी चिखली-मोशी-चऱ्होली-पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी केली आहे.**



याबाबत महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन देण्यात आले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, कुदळवाडी ,मोशी, चिखली या परिसरामध्ये रहिवासी झोनमध्ये चार ते पाच हजार बेकायदेशीर, अनाधिकृत, कोणतीही परवानगी न घेता स्क्रॅपची दुकान, कारखाने, शॉप, गोडाऊन चालू आहेत. या ठिकाणी अनेक बेकायदेशीर धंदे केले जातात. तसेच या ठिकाणी लोखंड बारीक करणे, प्लास्टिक जाळणे, इतर विघातक ज्वलनशील पदार्थ जाळणे, अशा अनेक गोष्टी घडतात त्यामुळे या भागामध्ये खूप मोठ्या प्रमाणात वायू प्रदूषण, तसेच नदीच्या कडेला हे व्यवसाय असल्याने जल प्रदूषण मोठ्या प्रमाणात होत आहे. या सर्व बेकायदेशीर गोष्टीमुळे या ठिकाणी मागच्या एका वर्षामध्ये 40 वेळा आगीच्या घटना घडलेल्या आहेत. परवाच या ठिकाणी खूप मोठ्या प्रमाणात आग लागली होती.

#### नागरिकांना सुरक्षीत वातावरण द्या...

याबाबत भोसरी विधानसभेचे आदरणीय आमदार महेश लांडगे यांनी देखील महाराष्ट्र विधानसभेच्या विशेष अधिवेशनामध्ये आवाज उठवून याकडे माननीय मुख्यमंत्री तसेच सभागृहाचे लक्ष वेधले होते. यावर राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी कारवाई करण्याचे निर्देश आपल्याला दिलेले आहेत. तरी कृपया त्वरित या ठिकाणी असणारी ही सर्व बेकायदेशीर दुकाने कारखाने स्क्रॅपचे गोडाऊन त्याच्यावर कारवाई करून ही या अनाधिकृत भाविक काढून टाकून नागरिकांचे प्रदूषणापासून त्याचप्रमाणे इतर गोष्टीपासून संरक्षण करावे, असेही पत्रात म्हटले आहे.

> “ कुदळवाडी, मोशी, चिखली या परिसरामध्ये हजारो बेकायदेशीर स्क्रॅपची दुकान, गोडाऊन, शॉप्स आहेत. या ठिकाणी बेकायदेशीरपणे रबर, प्लास्टिक इतर ज्वलनशील पदार्थ जाळले जातात त्यामुळे खूप मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होते. तसेच, या ठिकाणी अनेक अनाधिकृत धंदे देखील चालवले जातात याबाबत वारंवार तक्रार करून देखील महानगरपालिका त्याचप्रमाणे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याकडून कोणतीही कारवाई होत नाही. यावर लवकरात लवकर कारवाई झाली पाहिजे अन्यथा फेडरेशन मार्फत खूप मोठ्या प्रमाणात आंदोलन केले जाईल.
>
> 
>
> **-संजीवन सांगळे,**
> अध्यक्ष, चिखली- मोशी-चऱ्होली-पिंपरी-चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन.

#### कारवाई करा अन्यथा आंदोलन...

सोसायटी फेडरेशनकडून आमदार महेश लांडगे, पर्यावरण मंत्री, मुख्यमंत्री, देशाचे पंतप्रधान तसेच आपल्या महानगरपालिकेकडे वारंवार लिखित तक्रारी देखील केलेल्या आहेत. तरीदेखील यावर डोळेझाक करून कोणतीही कारवाई केली जात नाही, ही अतिशय चुकीची आणि गंभीर बाब आहे. महापालिका प्रशासनाने पुढील महिन्याभरात या सर्व बेकायदेशीर गोष्टीवर कारवाई न झाल्यास आमच्या फेडरेशन तर्फे याबाबत लोकशाही मार्गाने आंदोलने व इतर घटनात्मक गोष्टी केल्या जातील याची नोंद घ्यावी, असा इशाराही सोसायटी फेडरेशनने दिला आहे.

---

## वायसीएम रुग्णालयात रात्रनिवारा केंद्र आता अल्प दरात

### रुग्णांच्या नातेवाईकांची गैरसोय थांबणार, स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता

| पिंपरी |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील रुग्णांच्या नातेवाईकांना रात्रनिवारा केंद्र अल्प दरात उपलब्ध करून देण्याच्या विषयांसह महापालिका सभा आणि स्थायी समिती सभेची मान्यता आवश्यक असलेल्या विविध विषयांना प्रशासक शेखर सिंह यांनी काल झालेल्या बैठकीत मान्यता दिली.**




पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनातील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहामध्ये पार पडलेल्या या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर तसेच विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.

महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात पिंपरी चिंचवड शहरातील तसेच लगतच्या ग्रामीण भागातून तसेच पुणे जिल्ह्याबाहेरील देखील रुग्ण वैद्यकीय उपचारासाठी दीर्घकाळ दाखल होत असतात. शहराबाहेरून येणाऱ्या रुग्णांची संख्या अधिक असून रुग्णांच्या नातेवाईकांची गैरसोय होऊ नये यासाठी महापालिकेच्या वतीने रात्रनिवारा केंद्र उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. रुग्णालयासमोरील आवारात महापालिकेच्या वतीने उभारण्यात आलेल्या ११ मजली इमारतीच्या तळमजल्यावर फिजिओथेरपीच्या विभागालगतच्या जागेत रुग्णांच्या नातेवाईकांकरिता ही व्यवस्था करण्यात येणार आहे. या ठिकाणी नातेवाईकांनी स्वतः विश्रांती घेऊन त्यांच्या रुग्णांची देखभाल अथवा सुश्रुषा करणे अभिप्रेत आहे. रात्र निवारा केंद्रामध्ये पुरुषांसाठी ३५ बेड्स व महिलांसाठी २५ बेडची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून त्या ठिकाणी आवश्यकतेनुसार बेडच्या संख्येत बदल होऊ शकतो. महिला व पुरुषांसाठी प्रत्येकी ५ स्वच्छतागृहे ५ स्नानगृहांची स्वतंत्र व्यवस्था करण्यात येणार आहे.

ज्या गरजू तसेच आर्थिक दुर्बल नातेवाईकांना रात्र निवाऱ्याची आवश्यकता असल्यास त्यांना अत्यंत अल्प दरात रात्र निवाऱ्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

#### रात्र निवारा करिता प्रवेशाचे नियम व अटी

या निवारा केंद्र प्रवेशासाठी अर्जदाराचा रुग्ण महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील आंतर रुग्ण विभागामध्ये दाखल असणे आवश्यक आहे. कक्ष प्रवेशासाठी प्रवेश अर्ज भरणे व एमएसडब्ल्यू यांच्याकडून मंजूर करून घेणे आवश्यक आहे.

निवारा केंद्रामध्ये धूम्रपान मद्यपान तसेच अंमली पदार्थांवर बंदी असेल ते करताना आढळल्यास संबधितांवर दंड आकारून तसेच निवारा केंद्राचा प्रवेश रद्द करून कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

निवारा केंद्राचे शुल्क दररोज दुपारी बारा वाजेपर्यंत भरणे आवश्यक आहे व त्याची पावती एमएसडब्ल्यू यांच्याकडे जमा करणे आवश्यक आहे. अन्यथा तो बेड इतर नातेवाईकास दिला जाईल.

अर्जदार महिलांसोबत बारा वर्षाखालील मुलांना मोफत प्रवेश देण्यात येईल.

रात्र निवारा कक्षामध्ये बाह्य खाद्यपदार्थ खाण्यास व बनविण्यास परवानगी नाही.

पुरुषांना स्त्रियांच्या कक्षामध्ये व स्त्रियांना पुरुषांच्या कक्षामध्ये प्रवेश करण्यास मनाई आहे. या ठिकाणी कोणताही अनुचित प्रकार आढळल्यास संबंधितांवर पोलीस कारवाई करण्यात येईल.

रुग्णांच्या नातेवाईकांच्या सर्व वस्तूंची जबाबदारी त्यांची वैयक्तिक राहील. त्यास प्रशासन जबाबदार राहणार नाही, याची नातेवाईकांनी नोंद घ्यावी.

निवारा केंद्रात शांतता बाळगून नियमांचे पालन करणे बंधनकारक असेल.



भूमिका

# महाराष्ट्र पुढे जाणार तरी कसा?

**देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वात 'आता महाराष्ट्र थांबणार नाही!' असा बोभाटा केला जात आहे. याचा नेमका अर्थ काय घ्यायचा? महाराष्ट्र गुजरातला गेलेले उद्योग परत आणणार आणि गुजरातच्या पुढे जाण्याची हिंमत दाखवणार? आज सात लाख कोटी रुपयांहून अधिकचे कर्ज डोक्यावर असणारा महाराष्ट्र नेमका कशात थांबणार नाही आणि कुठे जाणार आहे?**

देवेंद्र फडणवीस यांच्या राजकीय कौशल्याचे वारेमाप कौतुक होत आहे. त्यांच्या राजकीय दूरदृष्टीचे आणि कौशल्याचे स्तुतिपाठ गायले जात आहेत. यशावर आरूढ झाल्यावर आजूबाजूला स्तुतिपाठक जमा होतातच. फडणवीस आता मातब्बर राजकारणी झाले आहेत त्यामुळे त्यांना स्वातंत्र्यानंतर काँग्रेसच्या नेत्यांनी आपल्याच कार्यकर्त्यांना दिलेला एक संदेश आठवत असेल,"भाटांनो दूर सरा, कीर्तीचे स्तोत्र नको, त्यागाने देश फुलो, हार तुरे मात्र नको!" लोकसभा निवडणुकीतील अपयशानंतर फडणवीस यांच्या ब्राह्मण असण्याबाबत त्यांच्याच पक्षातील मराठा नेते वक्तव्य करत होते. महाराष्ट्रात फडणवीस कसे चालणार नाहीत याबाबतच्या बातम्या महाराष्ट्र विधानसभेचा निकाल लागण्याआधी त्यांच्याच पक्षाकडून पेरल्या जात होत्या. मग फडणवीस यांनी राजकीय



कौशल्य पणाला लावले आणि दिवसाढवळ्या कोणीतरी गोवले गेले.

फडणवीस हुशार आहेत याबद्दल शंकाच नाही. एकनाथ खडसे यांनी त्यांची राजकीय कारकीर्द उद्ध्वस्त करण्यात फडणवीस यांचा सहभाग नव्हता असा खुलासा केला आहेच. विनोद तावडे, चंद्रकांतदादा पाटील, पंकजा मुंडेदेखील त्यांच्या सोबत खंबीरपणे उभे आहेत. भाजप म्हणजे भारत जलाओ पार्टी असे खुलेआम विधानसभेत म्हणणारे छगन भुजबळ आणि त्यावरून सभागृह डोक्यावर घेणारे देवेंद्र फडणवीस आता एकमेकांसोबत मांडीला मांडी लावून बसतील.आरे कारशेडसाठी रात्री झाडे तोडण्यास भाग पाडले तेव्हा फडणवीसच मुख्यमंत्री होते ना? अजित पवार यांच्याविरोधात बैलगाडीभर पुरावे असल्याचे सांगणारे, त्यांच्यावर ७० हजार कोटी रुपयांच्या सिंचन घोटाळ्याचे आरोप करून, 'राष्ट्रवादीबरोबर कधीही जाणार नाही, आपद् धर्म म्हणून नाही, शाश्वत धर्म म्हणून नाही. नाही नाही नाही!' असे ठामपणे म्हणणारेही फडणवीसच होते. नंतर सत्तेसाठी अजित पवार गटाला सोबत घेत त्यांच्या मूळ राष्ट्रवादी पक्षाला शिवसेनेप्रमाणेच नाव आणि चिन्हापासून वंचित ठेवण्यासाठी केंद्रातील सर्व शक्ती वापरणारे, रात्री हुडी घालून एकनाथी भारूड गाणारे फडणवीसच होते. पहाटे शपथविधी करून अवघ्या दीड दिवसासाठी सत्तेवर आल्यावर आणि ती सत्ता जाते हे लक्षात येताच महाराष्ट्राच्या वाटणीचा निधी दिल्लीला परत पाठवणारेही फडणवीसच होते.कोविडकाळात महाराष्ट्र संकटात असताना केंद्र सरकारला पैसे पाठवा, पीएम केअर निधीसाठी पैसे जमा करा, देवळे उघडा असे आवाहन करणारेही तेच होते. शिवसेनेचे नगरसेवक घोसाळकर यांचा खून झाला तेव्हा गाडीखाली कुत्रा आला तरी आम्हाला दोषी धरणार का, असा प्रश्न करणारेही तेच. वाढवण, नाणारसारखे प्रकल्प महाराष्ट्रात केवळ अदानींसाठी येऊ देणारे, छोटी राज्ये विकासाला पोषक अशी संघाची धारणा असल्याचे सांगणारे, वेगळ्या विदर्भाला पाठिंबा देणारे, विधिमंडळात नवाब मलिकांसारख्यांवर देशद्रोहाचे आरोप करून सत्ता मिळवण्यासाठी पुन्हा त्यांनाच सोबत घेणारेही फडणवीसच होते. महाराष्ट्राला झालेल्या या जखमा मतपेटीतून व्यक्त झाल्या कशा नाहीत, हाच प्रश्न आहे.आज मुंबईसह महाराष्ट्रातील स्थानिक मराठी माणसांची अवस्था दयनीय आहे. मराठीपण हरवले आहे. राज्यातील नद्या, नाले, तलाव खाड्या बुजवून; डोंगर-कपारी फोडून खारफुटीची जंगले नष्ट करून परप्रांतीयांना कायमस्वरूपी वसवले जात आहे. आपल्या नोकरी, उद्योग-धंद्यांत त्यांना वाटेकरी करण्यात आले आहे. ६४ वर्षांत परप्रांतीयांनी आपआपले मतदारसंघ तयार करून ८३हून अधिक अमराठी नगरसेवक, २५हून अधिक अमराठी आमदार, पाचहून अधिक अमराठी खासदार निवडून देऊन महाराष्ट्राच्या राजकारणात शिरकाव केला आहे.

## प्रासंगिक »

### परदेशी भूत!

***जगातील 'लोकशाहीची जननी' इत्यादी भरतवर्षाने भारताचा रहिवासीही नसलेल्या सोरोस यांची इतकी भीती का बाळगावी आणि त्यांच्या नावे इतके खडे का फोडावेत?***

स्वसामर्थ्याच्या प्रामाणिक जाणिवेचा अभाव असलेले प्रत्येक संकटासाठी इतरांस बोल लावतात तर खरे कर्तृत्ववान श्रेयासह अपश्रेयाचेही धनी होण्यात मागेपुढे पाहात नाहीत. व्यक्तींस लागू असलेला हा नियम व्यक्तिसमूहांच्या प्रदेशासही लागू होतो. या चिरंतन सत्याची जाणीव नव्याने करून देणाऱ्या दोन घटना. पहिलीत अमेरिका आपणास अस्थिर करण्याच्या प्रयत्नात असल्याचा अप्रत्यक्ष ठपका आपल्याकडून लावला गेला आणि दुसरीत धनाढ्य गुंतवणूकदार जॉर्ज सोरोस यांच्यावर आपल्याकडून तशाच स्वरूपाचा आरोप केला गेला. हे वयोवृद्ध सोरोस काँग्रेसच्या सोनिया गांधी यांच्याशी हातमिळवणी करून जम्मू-काश्मीर आपल्यापासून तोडण्याचा घाट घालत असल्याचे काही सरकारी उच्चपदस्थांचे म्हणणे. या विद्वत्तापूर्ण भाकितावर हसावे की रडावे असा प्रश्न.

आपल्या देशात नवीन ८५ केंद्रीय विद्यालयांना मान्यता सरकारने दिली आहे. यात अकोला याचा समावेश झाला असल्याने जिल्ह्यातील शैक्षणिक वर्तुळात उत्साहाचे वातावरण आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नव्या ८५ केंद्रीय विद्यालयांना मंजुरी दिल्यामुळे देशाचा शैक्षणिक दर्जा वाढण्यास मदत होणार आहे.

# विद्यालयामुळे वाढणार जिल्ह्याची शैक्षणिक गुणवत्ता

आपल्या देशात १२५६ केंद्रीय विद्यालय कार्यरत आहेत, ज्यात परदेशातील मॉस्को, काठमांडू आणि तेहरान या तीन केंद्रीय विद्यालयांचा सुद्धा समावेश आहे . या सर्व केंद्रीय विद्यालयांमध्ये एकंदर सुमारे १३.५६ लाख विद्यार्थी शिकत आहेत.एका केंद्रीय विद्यालयाच्या माध्यमातून सुमारे साडेपाच हजार रोजगार निर्मिती जिल्ह्यात होईल. केंद्रीय विद्यालयाच्या बांधकाम व इतर अनुषंगिक गोष्टींसाठी मनुष्यबळ लागणार आहे. विविध सुविधांच्या संबंधित बांधकाम आणि संबंधित बाबींसाठी अनेक कुशल आणि अकुशल कामगारांना रोजगाराच्या संधी निर्माण होतील. केंद्र सरकारने बदलीपात्र केंद्र सरकार/संरक्षण कर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी देशभरात एकसमान दर्जाच्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नोव्हेंबर १९६२ मध्ये केंद्रीय विद्यालयांच्या योजनेला मान्यता दिली होती. भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाचे एक युनिट म्हणून "केंद्रीय शाळा संघटना" सुरू करण्यात



आलेली आहे. सुरुवातीला, १९६३-६४ या शैक्षणिक वर्षात संरक्षण केंद्रांमधील २० रेजिमेंटल शाळा केंद्रीय शाळा म्हणून ताब्यात घेण्यात आल्या होत्या. केंद्रीय विद्यालये प्रामुख्याने संरक्षण आणि निमलष्करी दलांसह केंद्र सरकारच्या बदलीपात्र आणि बदली न करण्यायोग्य कर्मचाऱ्यांच्या मुलांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी आणि देशातील दुर्गम आणि अविकसित ठिकाणी राहणाऱ्या लोकांसह इतरांसाठी उघडली जातात. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी दर्शवणारी आणि इतरांसाठी आदर्श शाळा म्हणून काम करणारी जवळपास सर्व केंद्रीय विद्यालये पी एम श्री शाळा म्हणून नियुक्त करण्यात आली आहेत. दर्जेदार अध्यापन, नाविन्यपूर्ण अध्यापनशास्त्र आणि अद्ययावत पायाभूत सुविधांमुळे केंद्रीय विद्यालये ही सर्वाधिक मागणी असलेल्या शाळा बनल्या आहेत. दरवर्षी केंद्रीय विद्यालयांमध्ये प्रवेश मिळण्यासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संकेत सातत्याने वाढ होत आहे. बोर्ड परीक्षांमध्ये केंद्रीय विद्यालयांच्या विद्यार्थ्यांची कामगिरी सर्व शैक्षणिक प्रणालींमध्ये सातत्याने सर्वोत्तम राहिली आहे. अकोला शहरातील जिल्हा परिषद आगरकर विद्यालयात केंद्रीय विद्यालय सुरू करण्यासंदर्भात माहिती तत्कालीन केंद्रीय मनुष्यबळ विकास, दूरसंचार, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती व तंत्रज्ञान राज्यमंत्री संजय धोत्रे यांनी जून २०१९ मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित एका आढावा बैठकीत दिली होती. जिल्ह्यात केंद्रीय विद्यालय सुरू करण्यासंदर्भात प्राथमिक स्तरावरील आढावा बैठक जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनात घेण्यात आली होती.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# परभणी बंदला हिंसक वळण!

## दुकानांवर दगडफेक;जमावबंदीचे आदेश लागू, इंटरनेट सेवाही बंद

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**परभणीत काही समाजकंटकांनी बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ भारतीय संविधानाची तोडफोड केली. यानंतर वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर आक्रमक झाले आहेत. त्यांनी हल्लेखोरांना अटक करा अन्यथा परिणाम भोगावे लागतील असा इशाराच दिला आहे. परभणी या ठिकाणी तणावपूर्ण शांतता पाहण्यास मिळते आहे.**



परभणीत संविधानाच्या प्रतिची विटंबना करण्यात आल्याची घटना मंगळवारी घडली. त्यानंतर परभणीत आज बंदची हाक देण्यात आली. या दरम्यान बंदला हिंसक वळण लागलं आहे. परभणी शहरातील विसावा कॉर्नर परिसरामधील व्यापाऱ्यांनी बाहेर ठेवलेले पीव्हीसी पाईप पेटवून देण्यात आले, या पाईपला मोठ्या प्रमाणावर आग लागली. पोलिसांच्या गाडीवरही दगडफेक करण्यात आली. काही गाड्यांची मोडतोडही आंदोलकांकडून करण्यात आली. आंदोलकांनी काही दुकानांवर दगडफेक आणि जाळपोळ केली आणि पोलिसांच्या काही गाड्यांवरही दगड फेकले. त्यानंतर पोलीस ॲक्शन मोडवर आले. पोलिसांनीही या आंदोलकांवर सौम्य लाठीचार्ज केला. शहरात मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरातील संविधान प्रतिकृतीच्या नुकसानीमुळे निषेधासाठी जमलेल्या जमावाने आंदोलनाला हिंसक वळण दिले. यावेळी घोषणाबाजी करत टायर पेटवून महामार्ग रोखून धरला. परभणी नांदेड महामार्ग पूर्णपणे ठप्प झाला आहे. तसेच परभणीत जमावबंदीचे आदेश लागू करुन या शहरात इंटरनेट सेवाही बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहे. संविधानाचा अवमान करणाऱ्यांना फाशीची शिक्षा द्यावी, अशी आंदोलकांची मागणी आहे. राज्यघटनेच्या अवमानावरून कालपासून सुरू असलेल्या निदर्शनेदरम्यान महाराष्ट्रातील परभणीमध्ये हिंसाचार उसळला. बुधवारी दुपारी आंदोलकांनी अनेक भागात जाळपोळ केली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या सोडल्या. संविधानाचा अवमान करणाऱ्यांना फाशी देण्याची मागणी आंदोलक करत आहेत. परभणी रेल्वे स्टेशनवर मुंबईकडे जाणाऱ्या नंदीग्राम एक्सप्रेससमोर नारे दिले आणि गाडी रोखून धरली. दरम्यान आज परभणीत कडकडीत बंद पाळण्यात आला. बुधवारी सकाळपासूनच शहरातील अनेक भागात बंद पाळण्यात आला. बाजारपेठा, दुकाने, शाळा-महाविद्यालयात शुकशुकाट दिसला. जिल्हाभर सार्वजनिक ठिकाणी पाचपेक्षा जास्त व्यक्तींना जमा होण्यास प्रतिबंध आहे. भ्रमणध्वनी, फॅक्स, झेरॉक्स केंद्र, ध्वनिक्षेपके व इंटरनेट सेवा बंद ठेवण्याचे आदेश केले आहेत. ११ डिसेंबरच्या दुपारी १ वाजेपासून हे आदेश लागू राहतील. ध्वनिक्षेपकावरून ते पोलिसांनी जाहीर करावे, असेही आदेशात म्हटले आहे. दरम्यान, परभणीतील या घटनेवर वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी सरकारला इशारा दिला असून येत्या २४ तासांत सर्व हल्लेखोरांना अटक केली नाही तर त्याचे परिणाम भोगावे लागतील असा इशारा दिला आहे. परभणी शहरात एका समाजकंटकाने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसरात संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना केल्याचा प्रकार संतापजनक आहे. हे कृत्य करणाऱ्या व्यक्तीवर कठोर कारवाई करण्याची गरज आहे. संविधानाचा अवमान करणाऱ्यांना त्यातील समतेची तत्वे अमान्य आहेत असेच म्हणावे लागेल. या घृणास्पद कृत्याचा निषेध, असे राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या. बाबासाहेबांच्या पुतळ्याची किंवा दलित अस्मितेच्या प्रतिकाची अशी तोडफोड किंवा विटंबना होण्याची ही पहिलीच घटना नाही. वंचित बहुजन आघाडीचे परभणी जिल्ह्यातील कार्यकर्ते प्रथम घटनास्थळी पोचले. त्यांनी केलेल्या निषेध आणि निदर्शनांमुळे पोलिसांनी एफआयआर दाखल करून घेतला असून एका समाजकंटकाला अटक केली आहे. तरीही कायदा आणि सुव्यवस्था हातात घेऊ नका. शांतता राखा, असे आवाहन ॲड. आंबेडकर यांनी आंबेडकरी समाजाला केले आहे. येत्या २४ तासांत प्रशासनाने सर्व हल्लेखोर समाजकंटकांना अटक केली.

### परिणाम भोगावे लागतील- आंबेडकर

परभणीत संविधानाच्या प्रतिची विटंबना करण्यात आल्याची घटना मंगळवारी घडली. त्यानंतर परभणीत आज बंदची हाक देण्यात आली. या दरम्यान बंदला हिंसक वळण लागलं आहे. परभणी शहरातील विसावा कॉर्नर परिसरामधील व्यापाऱ्यांनी बाहेर ठेवलेले पीव्हीसी पाईप पेटवून देण्यात आले, या पाईपला मोठ्या प्रमाणावर आग लागली. पोलिसांच्या गाडीवरही दगडफेक करण्यात आली. काही गाड्यांची मोडतोडही आंदोलकांकडून करण्यात आली. आंदोलकांनी काही दुकानांवर दगडफेक आणि जाळपोळ केली आणि पोलिसांच्या काही गाड्यांवरही दगड फेकले. ज्यानंतर पोलीस ॲक्शन मोडवर आले. पोलिसांनीही या आंदोलकांवर सौम्य लाठीचार्ज केला.

# लाडकी बहीण योजनेचे निकष बदलले?

## अर्जांची पडताळणी होणार? तटकरेंनी थेट पत्रकच काढलं

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत राज्यातील सत्ताधारी महायुतीसाठी गेमचेंजर ठरली. लोकसभेला महायुतीला राज्यात मोठं अपयश पाहावं लागलं होतं. परंतु, त्यानंतर राज्यातील महायुती सरकारने राज्यातील महिलांना थेट आर्थिक लाभ देणारी ही योजना आणली.**



महायुतीमधील नेत्यांनी या योजनेचा व त्यामार्फत महायुती सरकारचा जोरदार प्रचार केला गेला. परिणामी महायुतीने राज्याच्या विधानसभा निवडणुकीत २८८ पैकी तब्बल २३५ जागा जिंकल्या. विरोधकांनीही लाडकी बहीण योजनेचा निकालावर परिणाम झाल्याचे मान्य केले. महायुतीला पुन्हा सत्ता मिळवून देण्यात मोलाची मदत करणाऱ्या या योजनेतील काही लाभार्थ्यांना मात्र आता लाभापासून वंचित राहावं लागू शकतं, अशी चर्चा समाजमाध्यमांवर पाहायला मिळत आहे. या योजनेचे निकष आता बदलले जातील, लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांच्या अर्जांची पडताळणी करून लाखो लाभार्थी महिलांचे अर्ज बाद होतील असे दावे केले जात आहे. याबाबत राज्याच्या महिला व बाल कल्याण विभागाला सातत्याने विचारणा होत आहे. तसेच माजी महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांना या प्रश्नांना सामोरं जावं लागत आहे. अखेर राज्याच्या महिला व बालकल्याण विभागाने या योजनेबाबत पसरत असलेल्या अफवांचं खडण केलं आहे. राज्याच्या महिला व बालकल्याण विभागाने या योजनेबाबत लोकांमध्ये पसरलेले संभ्रम दूर करणारं एक पत्रक जारी केलं आहे. आमदार आदिती तटकरे यांनी हे पत्रक समाजमाध्यमांवर शेअर केलं आहे. या पत्रकासह तटकरे यांनी एक्सवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की "मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेबद्दल रील्स व व्हिडिओच्या माध्यमातून दिशाभूल करणारी माहिती समाजमाध्यमांवर प्रसारित करण्यात येत आहे.

### जनतेच्या मनात गैरसमज

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना लागू झाल्यापासून आतापर्यंत योजनेच्या निकषांमध्ये कोणताही बदल झालेला नाही, एक महिला लोकप्रतिनिधी म्हणून यावर मी स्वतः जातीने लक्ष ठेवून आहे. तरी, याबाबत समाजमाध्यमांतून होणाऱ्या अपप्रचारास कोणीही बळी पडू नये ही नम्र विनंती".“सर्वांना कळविण्यात येते की राज्याच्या महिला व बालकल्याण विभागाच्या असे निर्देशनास आलेले आहे की, मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण योजनेबाबत समाजमाध्यमांवर रील्स व व्हिडीओंद्वारे वेगळी माहिती प्रसारित करण्यात येत आहे. जनतेच्या मनात गैरसमज निर्माण होत असून याबाबत वेगवेगळ्या स्तरावरून या कार्यालयाकडे विचारणा होत आहे.

# इंडिया आघाडीचा महाभियोग प्रस्ताव!

## महाभियोग प्रस्तावर विरोधी पक्षांच्या 36 खासदारांनी स्वाक्षरी केली

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती शेखर कुमार यादव यांनी काही दिवसांपूर्वी विश्व हिंदू परिषदेने आयोजित केलेल्या कार्यक्रमात सहभाग नोंदवला होता. यासह न्यायमूर्तींनी कार्यक्रमात काही वादग्रस्त वक्तव्ये केली होती. यानंतर आता राज्यसभेत इंडिया आघाडी न्यायमूर्ती यादव यांच्याविरुद्ध महाभियोग प्रस्ताव मांडण्यासाठी नोटीस देण्याच्या तयारीत आहेत.**



### न्यायमूर्तींच्या महाभियोगाची प्रक्रिया

”न्यायाधीश चौकशी अधिनियम, १९६८ नुसार, एखाद्या न्यायमूर्तींच्या विरोधात लोकसभेत महाभियोग प्रस्ताव दाखल करायचा असल्यास ५० खासदार आणि राज्यसभेत दाखल करायचा असल्यास त्यावर १०० खासदारांच्या स्वाक्षऱ्या असव्या लागतात. जर स्वीकारला तर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी दोन न्यायाधीश आणि एक न्यायशास्त्रज्ञ यांचा समावेश असलेली तीन सदस्यीय समिती स्थापन केली जाते. ही चौकशी पूर्ण झाल्यानंतर महाभियोग प्रक्रिया सुरू होते. संविधानाच्या कलम १२४ (४) नुसार महाभियोग प्रस्वाव मंजूर करण्यासाठी त्या सभागृहाच्या एकूण सदस्यसंख्येच्या बहुमताने आणि सभागृहात उपस्थित असलेल्या आणि मतदान करणाऱ्या सदस्यांपैकी कमीत कमी दोनतृतीयांश सदस्यांच्या बहुमताने पाठिंबा मिळणे आवश्यक असते.

राज्यसभा खासदार आणि वकील कपिल सिब्बल यांनी या प्रकरणी घेतलेल्या पुढाकारानंतर महाभियोग प्रस्तावर विरोधी पक्षांच्या ३६ खासदारांनी आधीच स्वाक्षरी केली असल्याचे सूत्रांनी सांगितले. यावर आणखी खासदारांच्या स्वाक्षऱ्या झाल्यानंतर विरोधी पक्ष गुरुवारी हा महाभियोग प्रस्ताव दाखल करू शकतात. दरम्यान राज्यसभे इंडिया आघाडीचे ८५ खासदार आहेत.दरम्यान या महाभियोग प्रस्तावावर आतापर्यंत काँग्रेसचे दिग्विजय सिंह, जयराम रमेश आणि विवेक तंखा यांनी स्वाक्षरी केली आहे. आम आदमी पक्षाच्या संजय सिंह, तृणमूल काँग्रेसचे साकेत गोखले, सागरिका घोष, आरजेडीचे मनोज कुमार झा, समाजवादी पक्षाचे जावेद अली खान, सीपीआय(एम) चे जॉन ब्रिटास आणि सीपीआयचे संतोष कुमार यांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत.गेल्या रविवारी, विश्व हिंदू परिषदेच्या कार्यक्रमात न्यायाधीश शेखर कुमार यादव म्हणाले होते की, “देशात राहत असलेल्या बहुसंख्य लोकांच्या इच्छेनुसार हिंदुस्थान चालेल, असे म्हणताना मला कोणताही संकोच वाटत नाही”. तसेच ते पुढे असेही म्हणाले होते की, “हा कायदा आहे आणि कायदा हा बहुसंख्यांकांनुसार चालतो. ज्याने बहुसंख्यांचे कल्याण तेच मान्य केले जाईल.”न्यायाधीश चौकशी अधिनियम, १९६८ नुसार, एखाद्या न्यायमूर्तींच्या विरोधात लोकसभेत महाभियोग प्रस्ताव दाखल करायचा असल्यास ५० खासदार आणि राज्यसभेत दाखल करायचा असल्यास त्यावर १०० खासदारांच्या स्वाक्षऱ्या असव्या लागतात.

हा प्रस्ताव दाखल केल्यानंतर पीठासीन अधिकाऱ्यांना तो स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार असतो. जर स्वीकारला तर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी दोन न्यायाधीश आणि एक न्यायशास्त्रज्ञ यांचा समावेश असलेली तीन सदस्यीय समिती स्थापन केली जाते. ही चौकशी पूर्ण झाल्यानंतर महाभियोग प्रक्रिया सुरू होते. संविधानाच्या कलम १२४ (४) नुसार महाभियोग प्रस्वाव मंजूर करण्यासाठी त्या सभागृहाच्या एकूण सदस्यसंख्येच्या बहुमताने आणि सभागृहात उपस्थित असलेल्या आणि मतदान करणाऱ्या सदस्यांपैकी कमीत कमी दोनतृतीयांश सदस्यांच्या बहुमताने पाठिंबा मिळणे आवश्यक असते. राज्यसभा खासदार आणि वकील कपिल सिब्बल यांनी या प्रकरणी घेतलेल्या पुढाकारानंतर महाभियोग प्रस्तावर विरोधी पक्षांच्या ३६ खासदारांनी आधीच स्वाक्षरी केली असल्याचे सूत्रांनी सांगितले. यावर आणखी खासदारांच्या स्वाक्षऱ्या झाल्यानंतर विरोधी पक्ष गुरुवारी हा महाभियोग प्रस्ताव दाखल करू शकतात. दरम्यान राज्यसभे इंडिया आघाडीचे ८५ खासदार आहेत.दरम्यान या महाभियोग प्रस्तावावर आतापर्यंत काँग्रेसचे दिग्विजय सिंह, जयराम रमेश आणि विवेक तंखा यांनी स्वाक्षरी केली आहे. आम आदमी पक्षाच्या संजय सिंह, तृणमूल काँग्रेसचे साकेत गोखले, सागरिका घोष, आरजेडीचे मनोज कुमार झा, समाजवादी पक्षाचे जावेद अली खान, सीपीआय(एम) चे जॉन ब्रिटास आणि सीपीआयचे संतोष कुमार यांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत.गेल्या रविवारी, विश्व हिंदू परिषदेच्या कार्यक्रमात न्यायाधीश शेखर कुमार यादव म्हणाले होते की, “देशात राहत असलेल्या बहुसंख्य लोकांच्या इच्छेनुसार हिंदुस्थान चालेल, असे म्हणताना मला कोणताही संकोच वाटत नाही”. तसेच ते पुढे असेही म्हणाले होते की, “हा कायदा आहे आणि कायदा हा बहुसंख्यांकांनुसार चालतो. ज्याने बहुसंख्यांचे कल्याण तेच मान्य केले जाईल.

# करोना लसीमुळे झाले नाहीत लोकांचे मृत्यू

## संसदेत मोदी सरकारने सांगितली अचानक मृत्यूंमागील कारणे

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**करोना काळानंतर तरुणांच्या अचनाक होणाऱ्या मृत्युंची संख्या वाढली आहे. या प्रकारानंतर करोना लशीमुळे तरुणांचे अचानक होणारे मृत्यू वाढल्याची सर्वत्र चर्चा होती. तसेच करोना लशीच्या दुष्परिणामांबाबतही अनेक उलट सुलट चर्चा होत असते. अशात केंद्रीय आरोग्य मंत्री जेपी नड्डा यांनी नुकतेच राज्यसभेत याबाबत माहिती दिली आहे.**




त्यांनी देशात होणाऱ्या तरुणांच्या अचानक मृत्यूंमागे करोना लस नसल्याचे सांगितले.राज्यसभेत बोलताना केंद्रीय आरोग्य मंत्री जेपी नड्डा म्हणाले की, “आयसीएमआरच्या अभ्यासात असे दिसून आले आहे की करोना लशीमुळे अचानक होणाऱ्या मृत्यूची शक्यता कमी होते. ICMR च्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ एपिडेमिओलॉजीने १८ ते ४५ वयोगटातील लोकांवर एक अभ्यास केला. यामध्ये अशा लोकांचा समावेश करण्यात आला ज्यांचा १ ऑक्टोबर २०२१ ते ३१ मार्च २०२३ दरम्यान मृत्यू झाला होता.”या संशोधनासाठी देशातील १९ राज्यांतील ४७ रुग्णालयांमधून नमुने घेण्यात आले होते. यातील २९१६ नमुने हृदयविकाराच्या झटक्यानंतर वाचलेल्या लोकांचे होते. तर ७२९ नमुने अचानक मृत्यू झालेल्यांचे होते.

या संशोधनानंतर असे सांगण्यात आले की, करोना लशीचा किमान एक किंवा दोन डोस घेतल्यानंतर अचानक मृत्यूची शक्यता बऱ्याच प्रमाणात कमी होते.करोना लस बणवणारी आघाडीची ब्रिटिश फार्मास्युटिकल कंपनी एस्ट्राझेनकाने त्यांनी निर्माण केलेल्या करोना लशीमुळे गंभीर दुष्परिणाम होऊ शकतात असे कबूल केले होते. भारतात एस्ट्राझेनकाची ही लस ‘कोविशील्ड’ म्हणून वापरण्यात आली आहे. या लशीमुळे रक्त गोठणे हा एक गंभीर दुष्परिणाम आहे. कंपनीने असेही म्हटले होते की, असले प्रकार केवळ दुर्मिळ प्रकरणांमध्येच होतात.


एस्ट्राझेनकाच्या या कबुलीनंतर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले होते. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने कोरोना लसीमुळे रक्ताच्या गुठळ्या झाल्याचा आरोप करणाऱ्या याचिका फेटाळल्या होत्या.

### लसीमुळे मृत्यूची शक्यता कमी

करोना काळानंतर तरुणांच्या अचनाक होणाऱ्या मृत्युंची संख्या वाढली आहे. या प्रकारानंतर करोना लशीमुळे तरुणांचे अचानक होणारे मृत्यू वाढल्याची सर्वत्र चर्चा होती. तसेच करोना लशीच्या दुष्परिणामांबाबतही अनेक उलट सुलट चर्चा होत असते. अशात केंद्रीय आरोग्य मंत्री जेपी नड्डा यांनी नुकतेच राज्यसभेत याबाबत माहिती दिली आहे. केंद्रीय आरोग्य मंत्री जेपी नड्डा म्हणाले की, “आयसीएमआरच्या अभ्यासात असे दिसून आले आहे की करोना

# बस कंडक्टर ते सुपरस्टार

थलायवा रजनीकांत हे दाक्षिणात्य मनोरंजनसृष्टीतील लोकप्रिय अभिनेते आहे. रजनीकांत आज आपला 73 वा वाढदिवस साजरा करत आहेत. मराठी कुटुंबात जन्माला आलेल्या रजनीकांत यांना साऊथमध्ये देवाचा दर्जा दिला जातो. जगभरात त्यांचा मोठा चाहतावर्ग आहे. रजनीकांत यांनी आपल्या करिअरमध्ये एका पेक्षा एक सिनेमांत काम केलं आहे. थलायवाचा आजही बोलबाला कायम आहे. अभिनयक्षेत्रात येण्याआधी रजनीकांत यांनी कंडक्टर म्हणून काम केलं आहे. रजनीकांत यांच्या 'जेलर' (JAILER) या सिनेमाने बॉक्स ऑफिसवर धमाकेदार कामगिरी केली आहे. सिनेसृष्टीत पदार्पण करण्याआधी रजनीकांत कंडक्टर म्हणून काम करायचे. हिरो व्हायचं त्यांचं स्वप्न होतं. हिरो होण्याचं हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांचे मित्र राज बहादुर यांनी त्यांना साथ दिली आहे. राज बहादुर यांनी रजनीकांत यांना मद्रास फिल्म इंस्टिट्यूटमध्ये प्रवेश घेण्याला सल्ला दिला होता. रजनीकांत यांना 1975 मध्ये 'अपूर्वा



रागनगाल' या सिनेमाच्या माध्यमातून पहिला ब्रेक मिळाला. पण 1983 मध्ये आलेल्या 'अंधा कानून' या सिनेमामुळे त्यांना लोकप्रियता मिळाली. रजनीकांत यांनी हिंदी, कन्नड, तेलुगू, बंगाली भाषेतील सिनेमांत काम केलं आहे. रजनीकांत हे भारतातील सर्वाधिक मानधन घेणारे अभिनेते आहेत. भारताबाहेरही त्यांचा मोठा चाहतावर्ग आहे. जगातील सर्वाधिक मोठा चाहता वर्ग असलेला अभिनेता म्हणून गिनिज बुकमध्ये त्यांचं

# 'पुष्पा 2' हजार कोटींच्या क्लबमध्ये



पुष्पा द रुल अर्थात पुष्पा २ हा सिनेमा ५ डिसेंबरला प्रदर्शित झाला. हा सिनेमा प्रदर्शित झाल्यापासूनच धुमाकूळ घालतो आहे. या सिनेमाची जागतिक स्तरावरची कमाई १ हजार कोटींच्या पुढे गेली आहे. ५ डिसेंबर ते ११ डिसेंबर इतक्या कमी कालावधीत एक हजार कोटी क्लबमध्ये गेलेला हा पहिलाच सिनेमा ठरला आहे.पुष्पा द रुल ( PUSHPA 2 या सिनेमात अल्लू अर्जुन, रश्मिका मंदाना, फहाद फासिल यांच्या प्रमुख भूमिका आहेत. सिनेमा प्रदर्शित झाल्यापासूनच बॉक्स ऑफिसवर बक्कळ कमाई करतो आहे. पहिल्याच दिवशी पुष्पा 2 ( PUSHPA 2 ) या सिनेमाने २९४ कोटींची कमाई केली होती. प्रदर्शित झाल्यानंतर हा सिनेमा अवघ्या सहा दिवसांमध्ये १ हजार कोटींच्या क्लबमध्ये पोहचला आहे.

मात्र हा सिनेमा एकच असा सिनेमा नाही जो एक हजार कोटींच्या क्लबमध्ये पोहचला आहे. याआधीचे असे खास चित्रपट आहेत ज्यांनी बॉक्स ऑफिसवर १ हजार कोटींहून अधिक कमाई केली आहे. एक हजार कोटींच्या क्लबमध्ये गेलेला एक महत्त्वाचा सिनेमा म्हणजे आमीर खानचा दंगल हा सिनेमा. या चित्रपटाने वर्ल्डवाईड १ हजार ९७० कोटींची कमाई केली आहे. हा सिनेमा महावीर फोगट आणि त्यांच्या मुलींवर म्हणजेच गीता आणि बबिता फोगट यांच्या आयुष्यावर बेतला आहे.यानंतर नाव घ्यावं लागेल ते बाहुबली २ द कनक्लुजन या सिनेमाचं. प्रभास, अनुष्का शेट्टी आणि राणा डग्गुबाती यांच्या या सिनेमात प्रमुख भूमिका आहेत. बाहुबली द कनक्लुजन या सिनेमाने १ हजार ८१४ कोटींचा व्यवसाय केला होता.

# समंथानं दिली गुडन्यूज!

साऊथची लोकप्रिय अभिनेत्री समंथा ही नेहमीच वेगवेगळ्या कारणांमुळे चर्चेत राहणारी सेलिब्रेटी आहे. तिने आता बॉलीवूडमध्ये देखील मोठ्या प्रमाणात लोकप्रियता मिळवली आहे. मनोज वाजपेयीच्या द फॅमिली मॅन नंतर समंथाची बॉलिवूडमध्येही लोकप्रियता वाढली. समंथा नेहमी सोशल मिडियावर सक्रिय असते. सध्या तिचे सिनेमे हिट होत नसले तर तिच्या लोकप्रियतेवर याचा काहीही परिणाम झालेला नाही. समंथा नागासोबतच्या घटस्फोटाच्या बातम्यामुळेही बरीच चर्तेत असते. आता मात्र समंथानं चाहत्यांसोबत एक गोड बातमी शेयर केली आहे. समंथा रुथ प्रभूने तिच्या चाहत्यांना एक खास भेट दिली आहे. समंथा रुथ प्रभूने तिच्या नव्या प्रोडक्शन हाऊसची घोषणा केली.

# दीपिकाची लेक झाली तीन महिन्यांची

अभिनेत्री दीपिका पादुकोण सध्या सोशल मीडियावर चर्चेत आली आहे. नुकतीच ती तिच्या तीन महिन्यांच्या लेकीला घेऊन पुन्हा सासरी परतली. लेक घरी परतल्याने रणवीर सिंह आणि आजी अंजू भवनानी यांना मोठा आनंद झाला आहे. दुआ घरी आल्यानंतर आनंद व्यक्त करत आजी अंजू यांनी नातीसाठी एक खास गोष्ट केली आहे. त्यामुळे आजी आणि नात दोघीही सोशल मीडियावर सध्या चर्चेत आहेत.दीपिका पादुकोण आणि रणवीर सिंह यांची मुलगी दुआचा जन्म ८ सप्टेंबर २०२४ ला झाला. ८ डिसेंबरला दुआ तीन महिन्यांची झाली आहे. तीन महिन्यांच्या लेकीसह दीपिका पुन्हा सासरी आली, त्यामुळे तीन महिन्यांच्या तिच्या वाढदिवसानिमित्त आजी अंजू यांनी तिला आशीर्वाद देत केस दान केले आहेत. त्यांनी केस दान करतानाचे काही फोटो आणि एक पोस्ट सोशल मीडियावर शेअर केली आहे.अंजू भवनानी यांनी त्यांच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर फोटो पोस्ट केले आहेत. त्यांचे अकाउंट खासगी आहे. मात्र, काही पापाराझींनी त्याचे स्क्रिनशॉट काढून ते सोशल मीडियावर पोस्ट करत याबद्दल माहिती दिली आहे. दुआ तीन महिन्यांची झाल्याने अंजू यांनी या पोस्टमध्ये तिला तीन महिन्यांच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच केस दान केल्याचे फोटो पोस्ट केलेत. यातील पहिल्या फोटोत त्यांनी केसांच्या काही भागाची वेणी घातली आहे व कॅप्शनमध्ये 'दान', असं लिहिलं आहे. दुसऱ्या एका फोटोत त्यांनी दान केलेल्या वेणीची उंची एका पट्टीच्या मदतीने मोजली आहे. या फोटोवरसुद्धा, 'दान', अशी कॅप्शन दिली आहे.त्यानंतर पुढे आणखी एका फोटोमध्ये केस दान केल्यानंतर त्यांनी सुंदर हेअरकट केला आहे. पुढील फोटोत एक पोस्ट आहे. यात अंजू यांनी लिहिलं, "दुआ बाळा, तुला तीन महिन्यांच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा, हा सुंदर दिवस प्रेमाने साजरा करूया. आम्ही जसजसे दुआ मोठी होतानाचा आनंद साजरा करत आहोत, तसतसे आम्हाला दयाळू, सकारात्मकता जाणवत आहे.



# 'फायर' चित्रपटातील इंटिमेट सीनबद्दल शबाना आझमी म्हणाल्या

बॉलीवूडमध्ये असे काही चित्रपट आहेत, ज्या चित्रपटांमुळे मोठ्या प्रमाणात विवाद निर्माण झाल्याचे पाहायला मिळते. शबाना आझमी(SHABANA AZMI) यांची मुख्य भूमिका असलेला 'फायर' हा अशाच चित्रपटांपैकी एक आहे. १९९८ साली प्रदर्शित झालेला फायर चित्रपट दीपा मेहता यांनी दिग्दर्शित केला होता. शबाना आझमी यांच्याबरोबरच अभिनेत्री नंदिता दास मुख्य भूमिकेत होत्या. समलैंगिक व्यक्तींमधील प्रेम अशा आशयाची कथा असलेल्या या चित्रपटाला मोठ्या प्रमाणात विरोधाचा, टीकेचा सामना करावा लागला होता. या चित्रपटाने भारतातील लेस्बियन आणि गे यांच्या हक्कांबद्दल चर्चा सुरू केली.'फायर' हा चित्रपट भारतीय संस्कृतीच्या विरुद्ध आहे. तसेच अश्लील असल्याचे अनेक राजकीय पक्षांनी म्हटले होते. हा चित्रपट



महिलांना बिघडवू शकतो, असेही अनेकांनी म्हटले होते. आता शबाना आझमींनी एका मुलाखतीत नंदीता दास यांच्याबरोबरच्या इंटिमेट सीनच्या शूटिंगचे काही किस्से सांगितले आहेत.शबाना आझमी यांनी नुकतीच 'रेडिओ नशाऑफिशिअल'ला मुलाखत दिली. या मुलाखतीत 'फायर' हा चित्रपटात काम करण्याचा निर्णय घेतला, याबद्दल बोलताना त्यांनी म्हटले, "जेव्हा मी स्क्रीप्ट ऐकली त्यावेळीच मला ती खूप आवडली होती. मला याची पूर्णपणे जाणीव होती की हे असे काहीतरी आहे, ज्याबद्दल भारतात खुलेपणाने बोलले जात नाही. त्यावेळी माझ्या मनात मी हे करू शकते का? या प्रश्नापेक्षा मी हे केले पाहिजे का? असा विचार सतत येत होता. मी फक्त हा विचार करत होते की जर हा चित्रपट प्रदर्शित झाला तर काय होईल? त्यानंतर मला या गोष्टीची जाणीव झाली की, मी प्रत्येक भारतीयाला एकसारखेच पाहू शकत नाही. सगळे सारखे नाहीत. काही जणांना आवडेल, काहींना आवडणार नाही. काहीजण नाराज होतील. पण कमीत कमी या चित्रपटामुळे प्रश्न विचारायला तरी सुरूवात होईल."

# मुंबई मुश्ताक अली ट्रॉफीच्या उपांत्य फेरीत!

## रहाणे-शॉच्या फलंदाजीसमोर विदर्भचा संघ पडला फिका

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अजिंक्य रहाणे-पृथ्वी शॉची बेधडक सुरूवात, शिवम दुबे आणि सूर्यांश शेडगेच्या भागीदारीच्या जोरावर मुंबई संघाने विदर्भचा ६ विकेट्सने आणि ४ चेंडू राखून दणदणीत विजय मिळवला. या विजयासह मुंबईचा संघ उपांत्य फेरीत पोहोचला आहे. सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धा आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. सध्या उप उपांत्यपूर्व फेरीचे सामने खेळवले जात आहे. यामध्ये मुंबई विरूद्ध विदर्भ असा अटीतटीचा सामना खेळवण्यात आला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना विदर्भ संघाने २२१ धावांचा डोंगर उभारला. मुंबईच्या या विजयात अजिंक्य रहाणे आणि पृथ्वी शॉची सुरूवात निर्णायक ठरली. या दोघांनी ६ षटकांत ८२ धावा केल्या आणि मुंबईच्या विजयाचा पाया रचला.**



उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात विदर्भ संघाने प्रथम फलंदाजी करताना २२१ धावांचा डोंगर उभारला.विदर्भ कडून अथर्व तायडेने ६६ धावा, करूण नायरने २६ धावा सुरुवात करून दिली. यानंतर अपूर्व वानखेडे आणि शुभम दुबे यांनी चांगली भागीदारी रचत संघाला मोठी धावसंख्या उभारण्यात मदत केली. अपूर्व वानखेडेने झंझावाती अर्धशतक झळकावले तर शुभम दुबेने ४३ धावांचे योगदान दिले. या फलंदाजांच्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर विदर्भाने मोठी संख्या उभारली आणि मुंबई संघाला विजयासाठी २२२ धावांचे मोठे आव्हान दिले. मुंबईकडून अथर्व अंकोलेकरने २, सूर्यांश शेडगेने २ तर तुश कोटियनने एक विकेट मिळवली. तर विदर्भकडून दिपेश परवानीने २, हर्ष दुबेने १ आणि यश ठाकूरने १ विकेट घेतली.मुंबई संघाकडून अजिंक्य रहाणे आणि पृथ्वी शॉ यांची जोडी फलंदाजीला उतरली. पृथ्वीच्या सुरुवातीपासूनच आपल्या जुन्या फॉर्मत परतल्याचे दिसून त्याने पाच चौकार आणि चार षटकारांच्या मदतीने २६ चेंडूत ४९ धावांची उत्कृष्ट खेळी केली. तर वादळी फलंदाजी करणाऱ्या अजिंक्य रहाणेचे थोडक्यासाठी शतक हुकले. अजिंक्य रहाणेने तीन षटकार आणि दहा चौकारांच्या मदतीने ४५ चेंडू ८४ धावांची मॅच विनिंग खेळी केली. यानंतर श्रेयस अय्यर आणि सूर्यकुमार यादव या महत्त्वाच्या सामन्यात फेल ठरले. यानंतर शिवम दुबे आणि सूर्यांश शेडगे यांनी चांगली भागीदारी रचत मुंबई संघाला चार चेंडू शिल्लक ठेवून विजय मिळवून दिला. सूर्यांश शेडगेने अखेरच्या षटकातील दुसऱ्या चेंडूवर षटकार लगावत संघाला दणदणीत विजय मिळवून दिला. मुंबई संघाने प्रत्युत्तरात ४ बाद २२४ धावा केल्या. अजिंक्य रहाणे च्या या मॅच विनिंग खेळीसाठी त्याला सामनावीर म्हणून निवडण्यात आले.विदर्भ संघाच्या २२१ धावा आणि मुंबईने केलेल्या २२४ धावा म्हणजेच एकूण ४४५ धावा अशी मोठी धावसंख्या या टी-२० सामन्यात उभारली गेली. जी मुंबई वि विदर्भच्या सामन्यांतील सर्वात मोठी धावासंख्या आहे.उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात विदर्भ संघाने प्रथम फलंदाजी करताना २२१ धावांचा डोंगर उभारला. विदर्भ कडून अथर्व तायडेने ६६ धावा, करूण नायरने २६ धावा सुरुवात करून दिली. यानंतर अपूर्व वानखेडे आणि शुभम दुबे यांनी चांगली भागीदारी रचत संघाला मोठी धावसंख्या उभारण्यात मदत केली. अपूर्व वानखेडेने झंझावाती अर्धशतक झळकावले तर शुभम दुबेने ४३ धावांचे योगदान दिले. या फलंदाजांच्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर विदर्भाने मोठी संख्या उभारली आणि मुंबई संघाला विजयासाठी २२२ धावांचे मोठे आव्हान दिले. मुंबईकडून अथर्व अंकोलेकरने २, सूर्यांश शेडगेने २ तर तुश कोटियनने एक विकेट मिळवली.

### अजिंक्य रहाणेचे शतक हुकले

विदर्भकडून दिपेश परवानीने २, हर्ष दुबेने १ आणि यश ठाकूरने १ विकेट घेतली.मुंबई संघाकडून अजिंक्य रहाणे आणि पृथ्वी शॉ यांची जोडी फलंदाजीला उतरली. पृथ्वीच्या सुरुवातीपासूनच आपल्या जुन्या फॉर्मत परतल्याचे दिसून त्याने पाच चौकार आणि चार षटकारांच्या मदतीने २६ चेंडूत ४९ धावांची उत्कृष्ट खेळी केली. तर वादळी फलंदाजी करणाऱ्या अजिंक्य रहाणेचे थोडक्यासाठी शतक हुकले. अजिंक्य रहाणेने तीन षटकार आणि दहा चौकारांच्या मदतीने ४५ चेंडू ८४ धावांची मॅच विनिंग खेळी केली. यानंतर श्रेयस अय्यर आणि सूर्यकुमार यादव या महत्त्वाच्या सामन्यात फेल ठरले. यानंतर शिवम दुबे आणि सूर्यांश शेडगे यांनी चांगली भागीदारी रचत मुंबई संघाला चार चेंडू शिल्लक ठेवून विजय मिळवून दिला. सूर्यांश शेडगेने अखेरच्या षटकातील दुसऱ्या चेंडूवर षटकार लगावत संघाला दणदणीत विजय मिळवून दिला.

# विराट-रोहितला कसोटी क्रमवारीत धक्का

## रूटला मागे टाकत हॅरी ब्रूक पहिल्या स्थानी, भारताचा यशस्वी जैस्वाल चौथ्या स्थानावर

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आयसीसीच्या नव्या कसोटी क्रमवारीत मोठी उलथापालथ झाली आहे. आतापर्यंत जो रूट फलंदाजांच्या क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर होता, मात्र आता बऱ्याच काळानंतर रूट क्रमवारीत दुसऱ्या स्थानी घसरला आहे. तर ट्रॅव्हिस हेड, कामेंदू मेंडिस, टेम्बा बावुमा यांना यावेळी मोठा फायदा होताना दिसत आहे. यावेळी टॉप १० यादीत अनेक मोठे बदल स्पष्टपणे दिसत आहेत. तर भारतीय फलंदाजांना धक्का बसला आहे.**




आयसीसीने जाहीर केलेल्या नवीन कसोटी क्रमवारीत इंग्लंडचा हॅरी ब्रूक आता अव्वल क्रमांकाचा फलंदाज बनला आहे. ब्रुकने जो रूटला मागे टाकत आयसीसी कसोट क्रमवारीत पहिले स्थान मिळवले आहे. यापूर्वी तो दुसऱ्या क्रमांकावर होता. आता त्याचे रेटिंग ८९८ गुणांवर पोहोचले आहे. जो रूट दुसऱ्या स्थानी गेला असून त्याचे रेटिंग ब्रुकपेक्षा एका गुणाने म्हणजेच ८९७ आहे. न्यूझीलंडचा केन विल्यमसन ८१२ रेटिंगसह तिसऱ्या स्थानावर आणि भारताचा यशस्वी जैस्वाल ८११ रेटिंगसह चौथ्या स्थानावर कायम आहे. त्याच्या क्रमवारीत कोणताही बदल झालेला नाही.दरम्यान, भारताविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीत शानदार शतक झळकावल्याचा फायदा ट्रॅव्हिस हेडला झाला आहे. त्याने एकाचवेळी ६ स्थानांनी झेप घेतली आहे. तो आता ७८१ च्या रेटिंगसह पाचव्या क्रमांकावर पोहोचण्यात यशस्वी झाला आहे. श्रीलंकेच्या कामेंदू मेंडिसलाही एका स्थानाचा फायदा झाला आहे. तो आता ७५९ च्या रेटिंगसह ६व्या क्रमांकावर पोहोचला आहे.

### पंतसह संयुक्तपणे नवव्या क्रमांकावर

दक्षिण आफ्रिकेचा कसोटी कर्णधार टेम्बा बावुमालाही तीन स्थानांचा फायदा होताना झाला आहे. तो आता ७५३ च्या रेटिंगसह ७व्या क्रमांकावर पोहोचला आहे.दरम्यान, झीलंडच्या डॅरिल मिचेलला तीन स्थानांचे नुकसान झाले आहे. तो आता ७२९ रेटिंगसह ८व्या क्रमांकावर पोहोचला आहे. भारताच्या ऋषभ पंतलाही फटका बसला असून तो आता ७२४ च्या रेटिंगसह ९व्या क्रमांकावर घसरला आहे. पंत ३ स्थानांनी घसरला आहे. पाकिस्तानच्या सौद शकीलचेही रेटिंग ७२४ आहे, त्यामुळे तो पंतसह संयुक्तपणे नवव्या क्रमांकावर आहे.